नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०२/०८/२०२६ (रविवार)

## कोणताही ठोस पुरावा  नसताना कौशल्यपूर्ण तपास करून खूनाच्या गंभीर गुन्ह्याचा यशस्वी उलगडा, २ आरोपी अटक

## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच श्री. अंकुश माने, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कोणताही ठोस पुरावा नसताना कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील खूनाच्या गंभीर गुन्ह्याचा यशस्वी उलगडा करून दोन आरोपींना अटक केली आहे.

दिनांक २०/०७/२०२६ रोजी पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील मांगली शिवारात अनिल धानोजे यांच्या विहिरीजवळील जंगल परिसरात एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला होता. सदर घटनेबाबत कळमेश्वर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. शवविच्छेदन अहवालात मृत्यू हा नैसर्गिक नसून खून झाल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १०३(१) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. कळमेश्वर पोलीसांसह स्थानिक गुन्हे शाखेने सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरू केला.

मृतकाचे चेहरा पुर्णपणे कुजलेला होता. तपासादरम्यान तांत्रिक पुरावे आणि कौशल्यपुर्ण तपास करून सदर मृतकाची ओळख अतुल चंद्रकांत तिवारी, वय २५ वर्षे, रा. भीमनगर, इसासनी रोड, लता मंगेशकर हॉस्पिटलजवळ, हिंगणा रोड, नागपूर अशी असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने निष्पन्न केली. तसेच एमआयडीसी पोलीस स्टेशन, नागपूर शहर येथे मृतक बेपत्ता असल्याबाबत दिनांक २२/०७/२०२६ रोजी तक्रार दाखल असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

सदर गुन्ह्याच्या तपासात प्रारंभी कोणताही ठोस पुरावा, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अथवा कोणत्याही प्रकारचा धागादोरा उपलब्ध नव्हता. असे असतानाही स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज, गोपनीय माहिती

**तसेच इतर उपलब्ध बाबींचे बारकाईने विश्लेषण करून तपासाची दिशा निश्चित केली. सखोल तपासात योगेश दीपक पोपळघट हा मृत्युपुर्वी मृतका सोबत असल्याचे निष्पन्न झाले. त्याला ताब्यात घेत त्याच्याकडे कौशल्यपूर्ण विचारपूस केली असता मनोज बुद्धेश्वर नारनवरे याच्यासह मिळून दिनांक १७/०७/२०२६ रोजी दोघांनी संगनमताने मृतकाचा खुन केल्याची माहिती प्राप्त झाली. आरोपी मृतकाच्या परिचयाचे असल्याचे निष्पन्न झाले. तसेच मृतक व आरोपी यांच्यामध्ये असलेल्या पैशांच्या वादातून दोन्ही आरोपींनी संगनमताने मृतकाचा खून केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यानुसार आरोपी क्र. १) योगेश दीपक पोपळघट, वय २८ वर्षे, रा. जयताळा, नागपूर यास जयताळा, नागपूर येथून तर आरोपी क्र. २) मनोज बुद्धेश्वर नारनवरे, वय २८ वर्षे, रा. सिल्लेवाणी, ता. पांढुरणा, जि. पांढुरणा, मध्य प्रदेश यास हिंगणा, नागपूर येथून ताब्यात घेऊन सखोल चौकशी करण्यात आली. चौकशीत गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने दोन्ही आरोपींना दिनांक ०२/०८/२०२६ रोजी अटक करण्यात आली. कोणताही ठोस पुरावा अथवा धागादोरा उपलब्ध नसताना कौशल्यपूर्ण तपासाच्या करून सदर गंभीर खूनाच्या गुन्ह्याचा यशस्वी उलगडा करण्यात आला.**

## २६० ग्रॅम गांजा जप्त, आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, जलालखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा :–** दिनांक ०१/०८/२०२६ रोजी जलालखेडा पोलीसांना गुप्त बातमीदाराने अंमली पदार्थ गांजा बाबत खात्रीशिर माहीती दिली की, लोहारी सावंगा ते कारंजा रोड वर एक इसम हा गांजा अंमली पदार्थ स्वत:जवळ बाळगून विक्री करीत आहे. पोलीसांनी सदर माहीती मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री. पराग पोटे , उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल विभाग यांना देत त्यांच्या मार्गदर्शनात मिळालेल्या माहीतीच्या आधारे सापळा रचुन जलालखेडा पोलीसांनी कारवाई करत लोहारी सावंगा ते कारंजा रोड वर **आरोपी नामे हरिभाउ राकृष्ण कामडी, वय ५८ वर्ष, रा. लोहारी सावंगा ता. नरखेड** हा अंमली पदार्थ गांजा विक्री करताना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता अंमली पदार्थ गांजा मिळुन आला.

**नमुद आरोपीच्या ताब्यातुन अंमली पदार्थ गांजा वजन २६० ग्रॅम किंमती ४०००/–रुपये, ०१ मोबाईल किंमती २०००/–रूपये असा एकुण ६०००/– रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद प्रकरणी आरोपीविरूद्ध पोलीस स्टेशन जलालखेडा येथे कलम ८(क), २० (ब) (ii) एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



# गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
# ०९ गोवंश जनावरांची सुटका, वडोदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा** :— दिनांक ०२/०८/२०२६ रोजी वडोदा पोलीसांनी अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी कढोली शिवार येथे जयस्वाल ढाबा समोर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान पोलीसांना एक संशयित बोलेरो पिकअप एम एच—४०/डी सी—३७५० येताना दिसली. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील चालकाने पोलीसांना पाहुन त्याचे वाहन दुर अंतरावर वाहन थांबवुन अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. वाहनाचा शिताफीने पाठलाग केला असता ०१ इसम मिळुन आला. त्याचे नाव व पत्ता विचारले असता क्लिनर नामे आदेश यशवंत झंझाड, वय १९ वर्ष, रा. पार्डी, ता. मोहाडी, जि. भंडारा अशी माहिती प्राप्त झाली. पळुन गेलेल्या चालकाचे नाव विचारले असता अर्जुन झंझाळ, रा. पार्डी, ता. मोहाडी, जि. भंडारा तसेच वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता मालक नामे अर्पित उर्फ श्रेयस किरण डाकरे, रा. पांजरा (वरठी), ता. मोहाडी, जि. भंडारा अशी माहिती प्राप्त झाली. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०९ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून बोलेरो पिकअप एम एच—४०/डी सी—३७५० किंमती ६,००,०००/— रूपये आणि ९ गोवंश जनावरे किंमती ९०,०००/— रूपये, ०१ मोबाईल असा एकुण किंमती ७,१०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

नमुद प्रकरणी आरोपी १) आदेश यशवंत झंझाड, वय १९ वर्ष, रा. पार्डी, ता. मोहाडी, जि. भंडारा २) अर्जुन झंझाळ, रा. पार्डी, ता. मोहाडी, जि. भंडारा ३) अर्पित उर्फ श्रेयस किरण डाकरे, रा. पांजरा (वरठी), ता. मोहाडी, जि. भंडारा यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन वडोदा येथे कलम ११(१), (इ), (डी), (फ), प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, सहकलम ५ (अ) (१), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९९५ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.



## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड :—** दिनांक ०१/०८/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी नरखेड ते सावरगाव रोडवर सावरगाव शिवार येथे नाकाबंदी केली असता संशयित १० चक्का टिप्पर ट्रक क्र. एम.एच. ४०/बि.एल ०७४१ मिळुन आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्पर चालक नामे प्रशांत गणपत दुधकवळे, वय २५ वर्ष, रा. सिंदी, ता. नरखेड हा मिळुन आला. मालकाबाबत विचारपुस केली असता मालक नामे पवन कमलजी कुमेरीया, वय २५ वर्ष, रा. पन्नालाल ले आउट जानकी नगर काटोल अशी माहिती प्राप्त झाली. वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता वाहनात क्षमतेपेक्षा जास्त १.६० ब्रास रेती मिळुन आली. पोलीसांनी पंचासमक्ष १) १० चक्का टिप्पर ट्रक क्र. एम.एच. ४०/बि.एल ०७४१ किंमती २०,००,०००/—रूपये २) ५. ८४ ब्रास रेती किंमती ३०,०००/— रूपये असा एकुण २०,३०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

नमुद आरोपी १) प्रशांत गणपत दुधकवळे, वय २५ वर्ष, रा. सिंदी, ता. नरखेड २) पवन कमलजी कुमेरीया, वय २५ वर्ष, रा. पन्नालाल ले आउट जानकी नगर काटोल यांचेविरूध्द पोस्टे नरखेड येथे कलम ३०३ (२), ४९ भा.न्या.सं सहकलम ६६(१)/१९२(अ), २०७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अवैधरित्या विनापरवाना देशी व विदेशी दारूची विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, ७३,५१०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक ०१/०८/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस ठाणे काटोल हद्दीतील मौजा मोहगाव ढोले खैरी डॅम जंगली भाग येथे अज्जु फॅमिली रेस्टॉरेंट मध्ये कोणत्याही प्रकारे बार (जागेचा) व दारूचा विक्री परवाना न बाळगता अवैधरीत्या देशी व विदेशी **दारूची विक्री करीत** आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन सापळा रचुन अवैधरित्या दारू विक्री करणाऱ्या आरोपी नामे मेनॅजर **१) सुभाष गोविंद सोमकुवर, वय ४८ वर्ष, रा. बानाबाकोडा, सौंसर जि. पांढुरणा (मध्यप्रदेश), ह. मु. मोहगाव ढोले** याला विचारपुस केली असता अज्जु बारचा मालक नामे **२) यश उर्फ अज्जू सुधीर वानखेडे, वय २५ वर्ष, रा. वानाडोंगरी हिंगणा, नागपूर, ३) अतुल चंपतराव वानखडे, वय ५७ वर्ष, रा. भाकरे ले आउट नागपूर** यांचे सांगणेवरून बार व्यवसाय करीत असल्याचे सांगितले. मॅनेजरला दारू विक्रीचा परवाना विचारला असता परवाना नसल्याचे सांगितले. रेस्टॉरेंटची पंचासमक्ष झडती घेतली असता नमुद आरोपींचे ताब्यात देशी व विदेशी दारू मिळुन आली. पोलीसांनी नमुद आरोपींच्या ताब्यातुन १) देशी दारूच्या ४८ निपा किंमती ३,८४०/— रूपये तसेच वेगवेगळया कंपनीच्या विदेशी दारूच्या २७९ निपा किंमती ५६,७९०/—रूपये, नगदी ८,०००/—रूपये, इतर साहित्य असा एकुण ७३,५१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन काटोल येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




## कन्हान पोलीस व नगरपरिषद कन्हान यांच्या तत्परतेमुळे तरुणीचे प्राण वाचले

दि. ०१/०८/२०२६ रोजी कन्हान पोलीस स्टेशन हद्दीतील कन्हान नदीवरील जुन्या पुलावरून एका तरुणीने उडी मारल्याची माहिती कन्हान पोलिसांना प्राप्त झाली. सदर माहिती मिळताच कन्हान पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थितीची पाहणी केली तसेच नगरपरिषद कन्हानच्या आपत्ती व्यवस्थापन व अग्निशमन दलाशी त्वरित संपर्क साधून मदत मागविली. माहिती मिळताच नगरपरिषद कन्हानचे आपत्ती व्यवस्थापन व अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. कन्हान पोलीस व नगरपरिषद कन्हान यांच्या संयुक्त प्रयत्नातून अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी आवश्यक सुरक्षा उपकरणांसह नदीपात्रात उतरून संबंधित तरुणीला सुखरूप बाहेर काढले. त्यामुळे वेळेवर करण्यात आलेल्या या बचाव कार्यामुळे तरुणीचे प्राण वाचले. या संपूर्ण बचाव मोहिमेदरम्यान कन्हान पोलीस व नगरपरिषद कन्हान यांनी उत्कृष्ट समन्वय साधून तत्परतेने कार्य केले. **त्यांच्या या त्वरित आणि प्रभावी कारवाईमुळे एका तरुणीला जीवदान मिळाले आहे.**

# अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीतांविरूध्द ०२ गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी :–** दिनांक ०१/०८/२०२६ रोजी बुट्टीबोरी पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता मौजा उमरेड रोड बुट्टीबोरी उडान पुलाचे खाली आरोपी क्र. १) नामे सागर मारोती उईके, वय २५ वर्ष, रा. बेदोली तालुका उमरेड, जिल्हा नागपुर तसेच केळवद पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता मौजा खाणगाव शिवार येथे आरोपी परमेश्वर राजेराम टेकाम, वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र ३ बिडगाव, ता. सावनेर हा स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी फिरतांना मिळुन आला. पोलीसांनी त्यांना विचारपुस केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. नमुद आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीतांचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०६ गुन्हे नोंद

दिनांक ०१/०८/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, विदेशी दारू, मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, ईतर साहित्य असा एकुण १,७१,५९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १) विजयसिंग जतनसिंग भोंड, वय ५० वर्ष, रा. बानोर चंद्र शिखबेडा २) बलवंतसिंग लडुसिंग बावरी, वय ४२ वर्ष, रा. बानोर चंद्र शिखबेडा ३) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) सुभाष गोविंद सोमकुवर, वय ४८ वर्ष, रा. बानाबाकोडा, सौंसर जि. पांढुरणा (मध्यप्रदेश), ह. मु. मोहगाव ढोले २) यश उर्फ अज्जू सुधीर वानखेडे, वय २५ वर्ष, रा. वानाडोंगरी हिंगणा, नागपूर, ३) अतुल चंपतराव वानखडे, वय ५७ वर्ष, रा. भाकरे ले आउट नागपूर ४) अतुल भगवान किरहाडे रा.वाडी नागपुर यांचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** आरोपी प्रशांत कवडु कामडी, वय ३८ वर्ष, रा. तितुर, ता. कुही याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन केळवद** आरोपी सुनिल बाबुराव भाकरे, वय ३२ वर्ष, रा. होळी चौक, सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १३१४० मिली देशी दारू, ५४०८० मिली विदेशी दारू, १०५ लिटर मोहाफुल दारू, १००० लिटर मोहाफुल रसायन सडवा, इतर साहित्य व नगदी असा एकुण १,७१,५९०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने